# कोल्हापूर जिल्हा परिषद
## अर्थ समिती सभा क्रमांक 10 / 2024-25
## प्रशासक कालावधी

वार - मंगळवार | वेळ - स 10.00 वा.
दिनांक 17 /01/2025 | स्थळ -मु.का.अ कक्ष

**-: कार्यवृत्तांत :-**

जिल्हा परिषद कोल्हापूर कडील प्रशासक कालावधीतील सन २०२४-२५ या अर्थिक वर्षातील अर्थ समितीची मासिक सभा ही १७/०१/२०२५ इ. रोजी सकाळी १०.०० वाजता मा मुख्य कार्यकारी धिकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे दालनामध्ये आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेस खालील प्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते.

1. **मा.श्री. कार्तिकेयन एस. - मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक**
2. **श्री अतुल आकुर्डे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा सदस्य सचिव**
3. **श्रीम अरूणा हसबे- उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी**
4. **श्री कृष्णात पाटील - लेखाधिकारी**
5. **श्री अनिकेत गावडे- लेखाधिकारी**

येणेप्रमाणे जिल्हा परिषद मुख्यालयाकडील सर्व विभागांचे लेखा प्रतिनिधी उपस्थित झालेनंतर सभेच्या कामकाजास सुरूवात करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक यांनी सुचित केले.

**श्री. अतुल आकुर्डे मुलेविअ -** आजच्या प्रशासक कालावधीतील वित्त समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक जि.प. कोल्हापूर तसेच वित्त विभाग व इतर विभागाकडील माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरवात करतो.

विषय क्रमांक -1

**मागील सभा दिनांक 20/12/2024 चा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

ठराव क्रमांक - 25

मागील सभा दिनांक 20/12/2024 चा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत यावा.

**विषय क्रमांक -2 कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे डिसेंबर 2024 ची जमा व खर्च पत्रके अवलोकन करून अंतिम मंजूरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणे.**

ठराव क्रमांक -26

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे डिसेंबर 2024 ची जमा व खर्च पत्रके अवलोकन करून अंतिम मंजूरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक 3 - मा.मुख्य कार्यकारी अधिकारीसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.**

**आयत्यावेळचा विषय क्रंमाक 1 -**

अन्य विषय व चर्चा नसलेने श्री अतुल आकुर्डे, मुलेववि‍अ यांनी पुढीलप्रमाणे आभार मानले.

आजच्या प्रशासक कालावधीतील वित्त समितीला उपस्थित असणारे मा. मुख्य कार्यकारी अधिकारीसो, सर्व विभागाकडील खाते प्रमुख, वित्त विभागाकडील उपमुलेविअ, लेखाधिकारी व इतर खात्याकडील लेखा कर्मचारी यांनी आजच्या अर्थ समितीचे सभा कामकाज चालविणेसाठी दिलेल्या सहकार्याबददल मी सर्वांचे मन:पुर्वक आभार मानून मा. मुख्य कार्यकारी अधिकारीसो यांच्या मान्यतेने आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**तथा**
**सदस्य सचिव जि.प.कोल्हापूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**तथा**
**प्रशासक, जि.प. कोल्हापूर.**